**दिनांक २१/०३/२०२५ रोजीचे विशेष सर्वसाधारण सभेत पारीत करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या प्रशासकीय ठरावाचा उतारा.**

**(स्थायी समिती कडून आलेले कामकाज)**

विषय क्रमांक २०७ – अमरावती महानगरपालिका सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर करणेबाबत.

ठराव क्रमांक २०७ – अमरावती महानगरपालिका सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक, यासोबत जोडलेल्या पुस्तिकेप्रमाणे मा.आयुक्त यांनी तयार करुन स्थायी समितीने त्यास दिनांक१३/०३/२०२५ रोजीचे ठराव क्रमांक ५५३ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. सदर अंदाजपत्रक हे सर्वसाधारण सभेसमोर अंतिम मान्यतेकरिता प्रस्तावित करण्यात आले.

**सन 2025 -26 च्या अंदाजपत्रकातील वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत :-**

- आरोग्याच्या सोईसुविधांचा विस्तार करणे या अंतर्गत विवक्षित क्षेत्रातील नागरिकांसाठी आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी 29 ठिकाणी शासनाचे आरोग्य मंदिरे प्रस्तावित होती त्यापैकि 20 आरोग्य मंदिरे कार्यन्वीत झालेली असुन ती पुर्ण क्षमतेने सुरु आहे. व उर्वरीत 9 आरोग्य मंदिरे या वर्षी कार्यान्वीत करण्यात येईल. या शिवाय पालिकेचे 9 प्राथमिक आरोग्य केंद्रात आवश्यक त्या सुविधा निर्माण करुन त्या कार्यान्वीत करणे व त्या पुर्ण क्षमतेने उपयोगात आणण्यात येवुन सर्व सामान्य नागरिकांसाठी उचित आरोग्य सेवा उपलब्ध करण्याकरीता आम्ही प्रयत्नशील आहोत. करिता आरोग्य सोई-सुविधा या अर्थसंकल्पीय शिर्षात 130.75 कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली असुन ती एकूण खर्चाच्या 32.63 टक्के इतकी आहे.
- अमरावती शहरवासीयांना स्वच्छतेचे महत्व कळविण्यासाठी जनजागृती करुन तसेच घराघरातुन कचरा संकलनात सुसुत्रता आणण्यांत येवुन घनकचरा व्यवस्थापन सक्षमतेने करुन स्वच्छतेच्या दर्जेदार मुलभुत सोई सुविधा पुरविण्यासाठी आम्ही संकल्पीत आहोत.
- अमरावती शहराला संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचारांचा वारसा लाभला आहे. त्यानुसार " स्वच्छ, सुंदर, हिरवे " शहर करण्याच्या दृष्टिने तसेच स्वच्छ पर्यावरण राखण्याचा आम्ही प्रयत्न करु.
- अमरावती महानगरपालिका शाळांचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी सर्व 63 शाळा डिजीटल झालेल्या असुन सर्व वर्ग खोल्या डिजीटल करण्याचे प्रस्तावित आहे. सुसज्ज ग्रंथालय निर्माण करण्यात आलेले आहे. शाळेच्या ईमारतीचे नुतणीकरण करुन मुलां करीता व मुलीं करीता स्वतंत्र स्वच्छता गृह निर्माण करण्यत येत आहे. मुलीं करीता ची "Vending Machine" ची व्यवस्था करणे. या सर्वांकरीता 25-26 च्या अर्थसंकल्पात 69.76 कोटी निर्धारीत केलेला असुन तो एकुण खर्चाच्या 17.41 टक्के इतका आहे.
- समग्र शिक्षा अभियाना अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अलिमनगर येथील शाळेते इमारती करीता रु. 2 कोटी प्राप्त झाले असुन त्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
- शहराच्या सौंदर्यीकरणच्या दृष्टिने मागील दोन वर्षापासुन कामे करण्यात येत असुन मुख्य चौकांचे सौंदर्यीकरणाची कामे पुर्ण झाली आहे. तसेच उर्वरीत चौकाची सौदर्यकरणाची कामे प्रगतीपथावर आहे. तसेच प्रमुख रस्त्यांवर, उड्डाण पुलावर हायमास्ट डेकोरेटिव्ह लॅम्प लावण्याचे काम लवकरच पुर्ण करणार आहे.
- शहरातील वाढते अतिक्रमण लक्षात घेऊन अतिक्रमण [illegible]के तयार करण्यात येवून शहरातील रस्ते सुचारु वाहतूकीसाठी मुक्त करण्याची प्रक्रिया निरंतर सुरु ठेवण्यात येईल ज्यामुळे अतिक्रमण करण्यास कोणीही धजावणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

- शहरातील वाढते अतिक्रमण लक्षात घेऊन अतिक्रमण पथके तयार करण्यात येवून शहरातील रस्ते सुचारु वाहतूकीसाठी मुक्त करण्याची प्रक्रिया निरंतर सुरु ठेवण्यात येईल ज्यामुळे अतिक्रमण करण्यास कोणीही धजावणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.
- अमरावती शहराचा मध्यवर्ती भागात असलेली " शिवटेकडी" येथे शिवसृष्टी निर्मिती करीता जिल्हा विकास योजने अंतर्गत निधी प्राप्त करुन पर्यटनाच्या दृष्टिकोणातून परिसर विकसित करण्याचे उद्दिष्ट आहे.
- युवक कल्याण या संकल्पनेत युवकांकरीता स्पर्धा परिक्षा तयारी साठी अस्तित्वात असलेल्या मार्गदर्शन केंद्रा व्यतिरिक्त इतर ठिकाणी नविन मार्गदर्शन केंद्र स्थापित करणे, ज्यामुळे जास्तीत जास्त युवकांना त्याचा लाभ घेता येईल. त्याचप्रमाणे युवक व्यवसायभिमुख होण्यासाठी वेळोवेळी व्यावसायिक मार्गदर्शन सत्र आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.
- शासनाच्या नगरोत्थान कार्यक्रम- शहर विकास आराखडा नुसार रस्ते विकास कामाचे नियोजना अंतर्गत शासन निधी व मनपा समभाग निधीने पुर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
- सामाजिक सुरक्षा अंतर्गत अग्निशमन सुविधांचे बळकटीकरण व नुतणीकरण करणे जेणे करुन अग्निशमन व आपातकालीन सेवा निर्धारीत वेळेवर सक्षमतेने पुरविण्या करीता 24 X 7 तास तत्पर ठेवणे. यात प्रामुख्याने अमरावती कडील दक्षिण भागात बडनेरा परिसरात मुख्य अग्निशमन केंद्र स्थापन करण्यात आले असुन त्याचे काम सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पुर्ण होवुन कार्यान्वीत करण्यांत येईल. त्याचप्रमाणे
रहाटगांव येथे अग्निशमन उपकेंद्राची निर्मीती कार्य सुरु असुन ती सुद्धा पुढील आर्थिक वर्षात कार्यान्वीत करण्यात येईल.
- स्वच्छ पर्यावरण राखण्याच्या दृष्टिने मृत लहान/ मोठ्या जनावरांची शवदाहीनी कार्यान्वीत करण्यात येईल.
- घनकचरा प्रकल्प व्यवस्थापन अंतर्गत शहरातील जमा होणा-या कच-यावर जैविक प्रक्रिया प्रकल्प भाग- २ ( फेज-२) अकोली येथे पुर्ण करण्यात येवुन कार्यान्वीत करणे.
- लोकसेवा हक्क अधिनियम -२०१५ नुसार नागरिकांना द्यावयाचा सोई-सुविधा निर्धारीत वेळेत देण्याकरीता विशेष सुविधा केंद्राची निर्मिती करुन ती कार्यान्वीत करणे व त्या नुसार नागरिकांची सनद अद्यावत करणे.

## सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चा प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज

(महसुली उत्पन्न व महसुली खर्चाचा गोषवारा)

महसुली उत्पन्न

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 23.55 | 17.73 | 1.03 |
| १.मनपा दर व कर | 394.55 | 321.10 | 337.21 |
| २.विशेष अधि. खालील वसुली | -- | -- | -- |
| ३.करआकारणी व्यतिरिक्त इतर शास्ती | 20.30 | 14.68 | 15.30 |
| ४.अनुदाने व अंशदाने | 48.16 | 40.09 | 42.12 |
| ५.संकीर्ण | 9.48 | 6.10 | 6.57 |

महसुली खर्च (रुपये कोटीत)

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| १.सा.प्र.विभाग | 137.83 | 129.35 | 135.76 |
| २.सार्वजनिक सुरक्षितता | 28.17 | 25.22 | 25.42 |
| ३.आरोग्य सोयी सुविधा | 170.45 | 146.98 | 130.75 |
| ४.शिक्षण विभाग | 68.34 | 64.55 | 69.76 |
| ५.अनुदाने व अंशदाने | 0.05 | 0.05 | 0.10 |
| ६.संकीर्ण | 6.50 | 1.00 | 6.60 |

| | | | |
|---|---|---|---|
| ६.मनपा स्वनिधी साठी कर्ज उभारणी/ सहभाग परत | -- | -- | -- |
| ७.एकुण महसुली उत्पन्न | 472.49 | 381.97 | 401.20 |
| प्रा.शिल्लक धरुन एकुण महसुली उत्पन्न | 496.05 | 399.71 | 402.03 |

| | | | |
|---|---|---|---|
| ७.भांडवली खर्च (मनपा स्व. निधी) | 82.84 | 30.89 | 31.36 |
| एकुण महसुली खर्च | 495.27 | 398.68 | 400.66 |
| अखेर प्रस्तावित शिल्लक | 0.78 | 1.03 | 1.57 |

## सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चा प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज

(भांडवली उत्पन्न व भांडवली खर्चाचा गोषवारा)

भांडवली उत्पन्न

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 102.16 | 132.64 | 144.23 |
| १.मनपा विशेष निधी | 41.66 | 23.97 | 29.37 |
| २.शासकीय अनुदाने | 396.76 | 182.61 | 274.59 |
| ३.एकुण भांडवली उत्पन्न | 438.42 | 206.61 | 303.97 |
| एकुण भांडवली उत्पन्न (आ.शि. धरुन) | 540.58 | 339.24 | 448.20 |

भांडवली खर्च (आकडे कोटीत)

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| १ मनपा विशेष निधी | 35.29 | 27.11 | 29.37 |
| २.शासकीय अनुदाने खर्च | 402.61 | 167.90 | 286.90 |
| ३.एकूण भांडवली खर्च | 437.89 | 195.01 | 316.28 |
| ४.अखेरची भांडवली शिल्लक | 102.69 | 144.23 | 132.92 |
| | | | |

## सन 2024-25 चा सुधारीत व सन 2025-26 चा प्रस्तावित अर्थसंकल्पीय अंदाज

(असाधारण ऋण व निलंबनाचा गोषवारा) (आकडे रुपये कोटीत)

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| प्रारंभिक शिल्लक | 18.39 | 18.24 | 16.45 |
| १.असाधारण ऋण व निलंबन | 14.79 | 15.56 | 20.80 |
| २.एकूण असाधारण ऋण व निलंबन | 14.79 | 15.56 | 20.80 |
| ३. एकुण असाधारण ऋण व निलंबन (आ.शि. धरुन) | 33.19 | 33.96 | 37.26 |

| तपशिल | 2024-25 मुळ अंदाज | 2024-25 सुधारीत | 2025-26 प्रस्तावित |
|---|---|---|---|
| १.असाधारण ऋण व निलंबन | 14.80 | 17.50 | 22.80 |
| २.एकूण असाधारण ऋण व निलंबन | 14.80 | 17.50 | 22.80 |
| ३.अखेरची शिल्लक | 18.40 | 16.46 | 14.46 |

## सन 2025-26 चा प्रस्तावित अंदाजपत्रकाचा गोषवारा

| अ.क्र. | तपशिल | महसूली | भांडवली | असाधारण ऋण व निलंबन | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| 1 | प्रारंभिक शिल्लक | 1.03 | 144.23 | 16.45 | 161.71 |
| 2 | एकुण उत्पन्न | 401.20 | 303.97 | 20.80 | 725.97 |
| 3 | प्रारंभिक शिल्लक धरुन एकुण उत्पन्न | 402.23 | 448.20 | 37.26 | 887.69 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | एकुण खर्च | 400.66 | 316.28 | 22.80 | 739.74 |
| 5 | अखेरची शिल्लक | 1.57 | 131.92 | 14.46 | 147.95 |

सन 2025-26 या वर्षात महानगरपालिकेची प्रारंभिक शिल्लक रु. 161.71 कोटी या मध्ये महसूली शिल्लक रु. 1.03 कोटी, भांडवली शिल्लक रु. 144.23 कोटी, असाधारण ऋण व निलंबन शिल्लक रु. 16.45 कोटीचा समावेश आहे. व सर्व बाजूने मिळणारे महसूली उत्पन्न रु. 401.20 कोटी, भांडवली उत्पन्न रु. 303.97 कोटी, असाधारण ऋण व निलंबन उत्पन्न रु. 20.80 कोटी चा समावेश आहे. असे एकूण रु 725.97 कोटी इतके उत्पन्न अपेक्षित केलेले आहे. परंतु भांडवली खर्चा करीता प्रारंभिक शिल्लक रु. 144.23 कोटी व भांडवली उत्पन्न रु. 303.97 कोटी असे एकूण रु. 448.20 कोटी प्राप्त निधीचा विनियोग शासनाने घालुन दिलेल्या अटी व शर्तीनुसार करावा लागतो, त्यामुळे मनपा कडील प्रारंभिक महसूली शिल्लक रु. 1.03 कोटी व मनपा चे एकुण महसूली उत्पन्न रु. 401.20 कोटी असे एकूण रु. 402.23 कोटी एवढे महसूली उत्पन्न असुन यामधुनच मनपा ला थकित व आवश्यक खर्चाची कामे करावी लागतात.

सन 2025-26 करीता एकूण खर्च 739.74 कोटी इतका अपेक्षित आहे, यामध्ये महसूली खर्च रु. 400.66 कोटी, भांडवली खर्च रु. 316.28 कोटी व असाधारण ऋण व निलंबन खर्च रु. 22.80 कोटीचा समावेश आहे. वर्षाअखेर महसूली अखेरची शिल्लक रु. 1.57 कोटी, भांडवली अखेरची शिल्लक रु. 131.92 कोटी, व असाधारण ऋण व निलंबन अखेरची शिल्लक रु. 14.46 कोटी, अशाप्रकारे एकूण रु. 147.95 कोटी शिल्लक राहील.

सन 2025-26 या आर्थिक वर्षात नविन मालमत्ता कराच्या कक्षेत आणल्यामुळे तसेच सुधारीत दराने कर आकारणी करण्यात येत असुन महसूली उत्पन्नाचे इतर स्त्रोत वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

सन 2025-26 चा अर्थसंकल्प सादर करताना आर्थिक स्त्रोतांचा तसेच महानगरपालिकेकडून अमरावतीकर नागरिकांच्या असलेल्या अपेक्षांचा योग्य तो ताळमेळ धालून, अमरावती शहर स्वच्छ, सुंदर, प्रदूषण मुक्त होऊन महानगरपालिकेतर्फे सेवा दर्जेदार , वेळेवर उपलब्ध करून देण्याच्या आशावादी दृष्टिकोनातून हा अर्थसंकल्प स्थायी समिती समोर सादर केलेला होता व त्यास स्थायी समितीने मान्यता प्रदान केलेली आहे. सद्यास्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने अमरावती महानगरपालिका सन 2024- 25चा सुधारीत व सन 2025-26 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास अंतिम मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

स्वा./-
नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती

स्वा./-
प्रशासक
महानगरपालिका,अमरावती

नगर सचिव
अमरावती महानगरपालिका
अमरावती